**(अध्यक्षस्थानी माननीय अध्यक्ष)**

**अध्यक्ष :** सन्माननीय सदस्यांनी मला प्रश्नोत्तराचा तास सुरु करु द्यावा.

**राज्याचे महाधिवक्ता श्री. श्रीहरी अणे यांनी केलेल्या कथित विधानासंबंधी**

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, विरोधी पक्षाने म.वि.स. नियम 97 अन्वये आजच्या कार्यक्रम पत्रिकेमध्ये दर्शविण्यात आलेला प्रश्नोत्तराचा तास स्थगित करुन गंभीर विषयावर चर्चा करणेबाबत विनंती केली आहे.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्राचे महाधिवक्ता श्री.श्रीहरी अणे यांनी जालना येथे काल वक्तव्य केले आहे. "स्वतंत्र मराठवाड्याच्या बाबतीत मराठवाडा राज्य निर्मितीची मागणी सुरु झाली व ती करण्याची गरज आहे", अशा प्रकारचे वक्तव्य त्यांनी केले. यापूर्वी त्यांनी स्वतंत्र विदर्भ राज्याच्या संदर्भात विधान केले होते. त्यावेळी विरोधी पक्षाने मागणी केली होती त्याचे स्पष्टीकरण आले नाही. त्यावेळी श्री.श्रीहरी अणे यांनी केलेल्या कथित विधानासंबंधी सरकारने त्यांचा राजीनामा घेऊन त्यांची हकालपट्टी करावी, अशी मागणी विरोधी पक्षाने केली होती. त्यावेळी शिवसेना पक्षाने सदनामध्ये हक्कभंगाचा प्रस्ताव मांडला होता. श्री.अणे यांनी मराठवाडा राज्य निर्मितीची नवीन मागणी करुन संयुक्त महाराष्ट्रासाठी बलिदान दिलेल्या 105 हुतात्म्यांचा अवमान केला आहे, हा केवळ त्यांचाच नव्हे तर राज्याचा अपमान आहे. मराठवाडा मुक्ती संग्रामाकरिता ज्या स्वातंत्र्य सैनिकांनी आपल्या प्राणांची आहुती दिलेली आहे त्यांचा अवमान करण्याचा अधिकार राज्याच्या महाधिवक्त्यांना आहे काय ? श्री.श्रीहरी अणे यांनी केलेल्या वक्तव्याने मराठवाड्यातील जनतेचा नव्हे तर राज्याचा अवमान झाला आहे. त्यामुळे या गंभीर विषयावर सदनामध्ये चर्चा होणे आवश्यक आहे. सरकारने राज्याचे महाधिवक्ता श्री.श्रीहरी अणे यांचा तत्काळ राजीनामा घेऊन त्यांची त्या पदावरुन हकालपट्टी करावी. संयुक्त मराहाराष्ट्र निर्मितीसाठी व मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या वेळी जे स्वातंत्र्य सैनिक शहीद झाले आहेत त्यांचा व राज्यातील जनतेचा श्री.श्रीहरी अणे यांच्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

वक्तव्याने अवमान झालेला आहे. या गंभीर विषयावर सदनाचे आजचे सर्व कामकाज बाजूला ठेवून चर्चा करण्यात यावी, अशी विरोधी पक्षाची मागणी आहे.

...2



श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, काही काळापूर्वी राज्याचे महाधिवक्ता यांनी विदर्भाच्या बाबतीत काही उद्‌गार काढले होते, त्यावेळी त्याचे पडसाद सभागृहात उमटले होते. आता पुन्हा राज्याचे महाधिवक्ता जालना येथे जातात व भाषण करतात की, "मराठवाड्याला स्वतंत्र करण्याची गरज आहे, त्यासाठी वेळ लागणार आहे, त्याकरिता मुख्यमंत्री महोदयांना दोषी धरु नये. मुख्यमंत्र्यांना दोषी धरण्याचे कारण नाही, लोकांची चळवळ उभी राहिली तर हा प्रश्न सुटेल". राज्याचे महाधिवक्ता उद्या कोल्हापूर, अलिबाग, नाशिक, धुळे येथे जाऊन वेगवेगळे भाषण करतील. राज्याचे महाधिवक्ता उघड माथ्याने फिरुन राज्यातील वेगवेगळ्या भागामध्ये जाऊन लोकक्षोभ निर्माण करण्याचा प्रयत्न करीत राहतील. राज्यपाल महोदयांच्या डायरेक्टीव्हजमध्ये राज्याचा इंबॅलन्स प्रश्न कसा सोडवावयाचा याची पूर्ण माहिती राज्याच्या महाधिवक्त्यास असते. या सरकारने नियुक्त केलेला महाधिवक्ता जर राज्यातील वेगवेगळ्या भागात जाऊन चिथावणीखोर भाषा वापरत असेल, महाराष्ट्र भंग पावण्यासाठी, राज्याचे तुकडे करण्यासाठी जर राज्यात फिरुन राज्य तोडण्याची भाषा बोलत असेल तर याच्या पेक्षा दुसरा घोर अपराध कोणताही असू शकत नाही. राज्याच्या नवीन महाधिवक्त्यांची नियुक्ती या सरकारनेच केली आहे, त्याची अशा प्रकारची भाषा वापरण्याचे धाडस कसे होते, त्यास कोणाचे प्रोत्साहन आहे, त्यास कोण अशी भाषा बोलण्यासाठी सांगतो ? राज्याच्या महाधिवक्त्याकडून महाराष्ट्रातील वेगवेगळ्या भागात जाऊन भूमिका मांडताना राज्याच्या मुख्यमंत्री महोदयांना प्रोटेक्शन देऊन भाषा वापरण्यात येते. लोकमत वर्तमानपत्रातील बातमी वाचली तर त्यामध्ये म्हटले आहे की, मराठवाडा वेगळा करावयाचा असेल तर महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना दोष देऊ नका. लोकक्षोभ निर्माण व्हावा, लोकांची भूमिका तयार व्हावी, अशा प्रकरचे हे वक्तव्य आहे.

अध्यक्ष महोदय, आपण मराठवाड्याचे नेते आहात. राज्याचा महाधिवक्ता अशा प्रकारचे वक्तव्य करुन भूमिका मांडत असेल तर मराठवाड्याच्या जनतेने आतापर्यंत जो त्याग केला, संघर्ष केला त्याचा हा अपमान आहे. या सरकारने राज्याचे महाधिवक्ता यांना ताबडतोब निलंबित करावे. ही अतिशय तातडीची बाब आहे. आज सदनातील सर्व विषयावरील चर्चा बाजूला ठेवून ॲडव्होकेट

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

जनरलचा सोक्षमोक्ष लावल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही. यासंदर्भात आपण निर्णय घ्यावा, अशी आमची विनंती आहे.

....3



श्री.प्रताप सरनाईक : अध्यक्ष महोदय, आज आपली विधानसभा अध्यक्ष या नात्याने खरोखर अग्नि परीक्षा आहे.

अध्यक्ष महोदय, राज्याच्या महाधिवक्ता यांनी राज्याचे तुकडे करण्याचा व तुकडे पाडण्याचा प्रयत्न केला. नागपूर अधिवेशनापूर्वी वादग्रस्त वक्तव्य करुन स्वतःला चर्चेत ठेवण्याचा राज्याच्या महाधिवक्त्यांने केविलवाना प्रयत्न केला आहे. त्यावेळी मी दिलेल्या हक्कभंगासंदर्भात माननीय मुख्यमंत्री यांनी निवेदन दिले होते की, "राज्याचे महाधिवक्ता श्री.श्रीहरी अणे यांचे हे वैयक्तिक वक्तव्य आहे." त्यानंतर राज्याचे महाधिवक्ता यांनी माहे फेब्रुवारी मध्ये विधिमंडळातील सन्माननीय सदस्य सदनामध्ये शेतकऱ्यांच्या विषयावर चर्चा न करता नको त्या विषयावर चर्चा करतात, असे वादग्रस्त वक्तव्य करुन विधिमंडळातील सर्व सन्माननीय सदस्यांचा अवमान केला आहे. काल जालना येथे राज्याचे महाधिवक्ता गेल्यानंतर, "स्वतंत्र विदर्भाच्या निर्मितीसाठी आम्हाला 40 वर्षे लागले आणि आज मराठवाड्याच्या निर्मितीसाठी सुध्दा मी तुमच्या बरोबर आहे. मराठवाड्यावर सुध्दा अन्याय झाला आहे, मराठवाडा वेगळा व्हावयास पाहिजे" असे वादग्रस्त वक्तव्य केले.

अध्यक्ष महोदय, संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीसाठी 106 हुतात्म्यांनी बलिदान देऊन हुतात्म्य पत्करले आहे, त्यांचा अपमान करण्याचा अधिकार राज्याचे महाधिवक्ता श्री.श्रीहरी अणे यांना कोणी दिला आहे. राज्य शासनाच्या माध्यमातून वेळोवेळी श्री.श्रीहरी अणे यांना पाठीशी घालण्यामागे सरकारचा छुपा अजेंडा नाही ना ? अशी चर्चा विरोधी पक्षामध्ये सुरु झाली आहे. आम्ही या सरकारमधील सत्ताधारी पक्षाचे सदस्य आहोत. उद्या आमच्यावर सुध्दा हा आरोप होऊ शकतो.

अध्यक्ष महोदय, ओवेसी देशाचे तुकडे पाडण्याचा प्रयत्न करीत आहेत व श्री.श्रीहरी अणे या महाराष्ट्राचे तुकडे पाडण्याचा प्रयत्न करीत आहेत. या ओवेसीच्या औलादिला आजच्या आज ताबडतोब निलंबीत करा. जोपर्यंत या श्री.श्रीहरी अणे यांना बडतर्फ करण्यात येणार नाही तोपर्यंत मी माझ्या सदनातील आसनावर बसणार नाही, भलेही मला निलंबीत केले तरी चालेल. परंतु

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

कोणत्याही परिस्थितीत श्री.श्रीहरी अणे यांना आजच्या आज निलंबीत करुन त्यांच्या वक्तव्यासंदर्भात सदनामध्ये चर्चा घडवून आणावी.

....4



श्री.प्रताप सरनाईक.......

अध्यक्ष महोदय, आज आपली अग्नी परीक्षा असून या अग्नी परिक्षेमध्ये आपण सरकारची बाजू घेणार, महाराष्ट्राची घेणार की मराठवाड्याची बाजू घेणार, हे सिध्द होणार आहे. कोणत्याही परिस्थितीत देशाचे तुकडे पाडण्याकरिता भारत विरोधी वक्तव्य करणाऱ्या श्री.वारीस पठाण यास आपण निलंबीत केले. लोकप्रतिनिधींना एक न्याय व राज्याच्या महाधिवक्त्यास दुसरा न्याय या सभागृहास देता येणार नाही. त्यामुळे श्री.अणे यांना ताबडतोड निलंबीत केले पाहिजे, आजच्या आज त्यांना निलंबीत करुन आपण भूमिका स्पष्ट करावी, अशी माझी मागणी आहे.

यानंतर B-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. ग. आ. देशमुख : अध्यक्ष महोदय, सरकारने या राज्याचे नेमलेले ॲडव्होकेट जनरल कशासाठी आहेत तर या सरकारला कायदेशीर सल्ला देण्यासाठी ते नेमलेले आहेत. विधानसभेला कायदेशीर सल्ला देण्याबाबत प्रसंग असेल तर आपण त्यांना या ठिकाणी बोलावितो आणि त्यांच्याकडून कायदेशीर सल्ला घेतो. ॲडव्होकेट जनरल हे असे एकमेव अधिकारी आहेत की, त्यांना या विधानसभेमध्ये हजर राहून विधानसभेला कायदेशीर सल्ला देण्याची जबाबदारी त्यांच्यावर आहे. असे असताना, मी या ठिकाणी शब्द वापरत नाही. पण काही दिवसांपूर्वी विदर्भ राज्य वेगळे असावे अशातऱ्हेची भूमिका त्यांनी मांडली आहे. त्यावेळेला विधानसभेने त्यांच्या भूमिकेवर आपली प्रतिक्रिया नोंदविली आहे. कायद्याने त्यांच्यावर जी जबाबदारी सोपविली आहे ती न पार पाडता वेगळे काही तरी धोरण घेणे आणि त्या अनुषंगाने संसदेने एकमताने ठराव करुन हे राज्य निर्माण केलेले असताना या राज्याचे विभाजन करावे अशा प्रकारची भूमिका ॲडव्होकेट जनरल घेत असतील तर अध्यक्ष महाराज आपण काय शब्द वापरायचा तो वापरावा मी वापरत नाही. त्यांनी काल जालना येथे मराठवाडा वेगळा व्हावा अशा प्रकारची भूमिका घेतली आहे. अशी भूमिका आजपर्यंत विधानसभेच्या कोणत्याही सन्माननीय सदस्याने या सभागृहात मांडल्याचे मला आठवत नाही किंवा ऐकिवातही नाही. असे असताना हे ॲडव्होकेट जनरल अशी भूमिका मांडत आहेत.

अध्यक्ष महाराज, या राज्याच्या जनतेवर आणि या विधानसभेवर अन्याय होणारी भूमिका मांडताना खरे म्हणजे त्यांना अशी भूमिका मांडावयाची असेल तर त्यांनी ताबडतोब राजिनामा दिला पाहिजे आणि त्यांनी राजिनामा द्यावा अशी मी या ठिकाणी मागणी करीत आहे. जर ते राजिनामा देत नसतील तर सरकारने त्यांची हकालपट्टी करावी आणि एवढेच नव्हे तर ही विधानसभा माननीय राज्यपालांना विनंती करते की, त्यांचे स्पष्टीकरण मागवून घेऊन माननीय राज्यपालांनी त्यांची हकालपट्टी करावी. अध्यक्ष महाराज, आपण मराठवाड्यातून लोकप्रतिनिधी म्हणून येत आहात, त्यामुळे आपल्यावर सुध्दा हा अन्याय आहे. अशा परिस्थितीमध्ये नियम 57 अन्वये जो प्रस्ताव या ठिकाणी आणला आहे त्याला मी पाठिंबा देतो. या राज्याचे विभाजन न होणे याच्यापेक्षा दुसरा कोणताच महत्वाचा विषय या ठिकाणी नाही. त्यामुळे अशा प्रकारच्या या प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी आपण त्यास मान्यता द्यावी, अशी मी विनंती करतो आणि माझे दोन शब्द पूरे करतो.

2.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते आणि या सभागृहाच्या या बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी या राज्याच्या ॲडव्होकेट जनरल यांच्या विरोधात जी मागणी केली आहे, खरे म्हणजे या आधी सन्माननीय सदस्य श्री. प्रताप सरनाईक यांनी या ॲडव्होकेट जनरल यांच्या संदर्भात नागपूरच्या अधिवेशनात एक हक्कभंगाचा प्रस्ताव सादर केलेला आहे. आज त्यांनी मराठवाडा वेगळा करावा यासाठी जी भूमिका घेतली आहे, त्याचे वृत्त सर्व वृत्तपत्रात आज प्रसिध्द झालेले आहे. त्या संदर्भात प्रश्नोत्तराचा तास रद्द करुन या विषयावर चर्चा घ्यावी अशी भूमिका या ठिकाणी मांडली आहे. त्यावर अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले मत या ठिकाणी व्यक्त केले आहे. अध्यक्ष महोदय, मी आपले लक्ष भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद 165 कडे वेधू इच्छितो. यामध्ये असे म्हटले आहे की,

"165. (1) The Governor of each State shall appoint a person who is qualified to be appointed a Judge of a High Court to be Advocate-General for the State.

(2) It shall be the duty of the Advocate-General to give advice to the Government of the State upon such legal matters, and to perform such other duties of a legal character, as may from time to time be referred or assigned to him by the Governor, and to discharge the functions conferred on him by or under this Constitution or any other law for the time being in force."

अध्यक्ष महोदय, मला कायद्यातील जे थोडेफार कळते, त्याचा स्पष्ट अर्थ असा आहे की, भारतीय राज्य घटनेच्या अनुच्छेद 165 अन्वये ॲडव्होकेट जनरल यांना जे काम दिलेले आहे आणि ज्यांची नेमणूक माननीय राज्यपालांनी जी केलेली आहे, सरकारच्या सल्ल्याने केलेली आहे, त्या ॲडव्होकेट जनरल यांना सरकारला सल्ला देण्याचे काम असून तोही कायदेशीर असेल तो देण्याचे काम त्यांच्यावर निश्चित करण्यात आलेले आहे. सभागृहाच्या बाहेर जाऊन त्यांनी एखादी वैयक्तिक भूमिका मांडली तर त्याला हरकत नाही. पण राज्याच्या हिताच्या विरोधात या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दिलीप वळसे-पाटील.....

सभागृहाच्या बाहेर भूमिका मांडली तर ती या राज्याला मान्य करता येणार नाही. एखाद्या प्रश्नावर, एखाद्या डेव्हलपमेंटवर राज्य सरकारच्या विरोधात भूमिका मांडली असती तर मी समजू शकलो असतो. पण मूळात या राज्याचे तुकडे करण्यासंदर्भामध्ये, विदर्भ वेगळा झाला पाहिजे, मराठवाडा वेगळा झाला पाहिजे आणि त्यासाठी लोकांनी उठाव केला पाहिजे अशा प्रकारचे लोकांना इन्स्टिगेट करायचे, लोकांना प्रोव्होक करायचे काम राज्याचे ॲडव्होकेट जनरल करीत असतील तर ही त्यांची ड्यूटी नाही. म्हणूनच सन्माननीय सदस्य श्री. प्रताप सरनाईक यांनी सांगितले की, कोणी तरी देश तोडण्याची भाषा करतो आणि कोणी तरी राज्य तोडण्याचा विचार करीत असेल तर हे राज्य शेवटी निर्माण कशातून झाले आहे ? या सभागृहाच्या इतिहासामध्ये एवढ्या वर्षात एका सुध्दा सन्माननीय सदस्याने या ठिकाणी आमचा मराठवाडा वेगळा झाला पाहिजे, अशी भूमिका घेतलेली नाही. आपली काय भूमिका आहे मला माहिती नाही. अध्यक्ष महोदय, मी आपल्याला या ठिकाणी विनंती करतो की, ज्यावेळी राज्याचे मुख्यमंत्री ज्यावेळेला मुख्यमंत्री पदाची शपथ घेतात त्यावेळी या संयुक्त राज्याचे मुख्यमंत्री म्हणून ते शपथ घेतात. त्यामुळे मुख्यमंत्री जर या राज्याचा मुख्यमंत्री म्हणून शपथ घेत असेल तर आणि या राज्यामध्ये या राज्याचे तुकडे करण्याची भूमिका कोणी मांडत असेल आणि आपण या सभागृहामध्ये ती त्यांची वैयक्तिक भूमिका आहे असे म्हणून त्याचे समर्थन करीत असू तर हे बरोबर नाही. म्हणून माझी आपणास विनंती आहे की, या प्रश्नाची तड लावण्यासाठी दोन बाबी आहेत. एक तर ॲडव्होकेट जनरलने स्वतःहून राजिनामा दिला पाहिजे आणि ते राजिनामा देणार नसतील तर सरकारने त्यांची हकालपट्टी केली पाहिजे. अन्यथा या संदर्भामध्ये विधानसभेने ठराव करुन गर्व्हनरला भेटायला जाऊन आणि आपण विनंती करु की, या राज्याच्या हिताच्या विरोधामध्ये या राज्याचा एखादा लिगल स्टेटस असलेला अधिकारी राज्याच्या विरोधात भूमिका घेत असेल तर ती भूमिका हे सभागृह डोळे झाकून या ठिकाणी पाहू शकत नाही. ही चूक एकदा झालेली नाही तर दोनदा झालेली आहे. कदाचित जाणून-बुजून कुणी तरी त्यांना प्रोव्होक करीत असले पाहिजे. कदाचित त्यांच्या मनाने करतात की, कुणाच्या सांगाण्यावरुन करतात हे आम्हाला माहिती नाही. परंतु आज कोणी तरी विदर्भ वेगळा करण्याची भूमिका मांडेल. उद्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

कोणी तरी मराठवाडा वेगळा करण्याची भूमिका मांडेल. परवा कोणी तरी पश्चिम महाराष्ट्राची

4........



श्री. दिलीप वळसे-पाटील.....

भूमिका मांडेल. त्यानंतर कोणी तरी मुंबई केंद्र शासित करण्याची भूमिका मांडेल. या राज्याचे तुकडे करण्यासाठी आम्ही सर्व सदस्य या ठिकाणी निवडून आलेलो नाही. म्हणून ही एक धोक्याची घंटा आहे आणि म्हणून पुढे जर धोका व्हायचा नसेल आणि या राज्यासाठी ज्या 106 हुतात्म्यांनी बलिदान केले आणि संयुक्त महाराष्ट्राची चळवळ केली. या सर्व लोकांचा आदर ठेवून या संदर्भातील निर्णय आपण आजच दिला पाहिजे.

C-1....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिलीप वळसे-पाटील........

अध्यक्ष महोदय आपण सुध्दा मराठवाड्याचे एक ज्येष्ठ नेते आहात. मराठवाड्यातील लोकांची भूमिका या राज्याबरोबर राहण्याची आहे. विदर्भातील लोकांची भूमिका सुध्दा या राज्याबरोबर राहण्याची आहे. सन्माननीय सदस्य डॉ.सुनिल देशमुख यांनी सुध्दा या विषयासंदर्भात स्पष्टपणे मांडले पाहिजे. माझी आपणास विनंती आहे की, प्रश्नोत्तराचा तास स्थगित करुन सभागृहात चर्चा सुरु करावी.

श्री.गिरीष बापट : अध्यक्ष महोदय, यासंदर्भामध्ये चर्चा चालू आहे. यामध्ये काल ॲडव्होकेट जनरलने जे मत व्यक्त केले.....( अडथळा )

**अध्यक्ष** : सन्माननीय सदस्य श्री.प्रताप सरनाईक बोलले. या विषयावर सर्वांचे बोलून झालेले आहे.

श्री.गिरीष बापट : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील याकरिता माननीय अध्यक्ष आहेत. आपण जुने सन्माननीय सदस्य आहात माननीय अध्यक्षांना काय करायचे ते याठिकाणी बघतील. (अडथळा.....)

**अध्यक्ष** : गटनेत्यांना, विरोधी पक्षनेत्यांना, काही पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना बोलायला दिलेले आहे.

श्री.गिरीष बापट : अध्यक्ष महोदय, माननीय मुख्यमंत्री सभागृहात आल्यानंतर आपण गटनेत्यांची बैठक घेऊ. या विषयाचे गांभीर्य लक्षात घेता विरोधी पक्षासकट सर्व गटनेत्यांची बैठक घेऊ. बैठकीनंतर याचा निर्णय सभागृहामध्ये घेण्यात येईल.

( दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकत्रितपणे घोषणा देत असतात. )

**अध्यक्ष** : अशा परिस्थितीत सभागृहाचे कामकाज चालविणे अशक्य असल्यामुळे मी सभागृहाचे कामकाज 15 मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक सकाळी 11 वाजून 21 मिनिटांनी, 15 मिनिटांकरिता स्थगित झाली.)

-------

D-1.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**( स्थगितीनंतर )**

**( अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री.योगेश सागर )**

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात)

**तालिका सभाध्यक्ष** : सर्व स्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी आपापल्या जागेवर बसावे.

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात )

अशा परिस्थितीत सभागृहाचे कमकाज चालविणे मला शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक दुपारी 12.00 वाजेपर्यंत स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक सकाळी 11 वाजून 36 मनिटांनी दुपारी 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

E-1........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(स्थागितीनंतर)**

**(अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री.योगेश सागर)**

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य घोषणा देत वेलमध्ये येतात)

**तालिका सभाध्यक्ष** : सन्माननीय सदस्यांनी कृपया जागेवर बसावे. (व्यवधान) आपके नेता बोल चुके है. यह मराठवाड़ा का विषय है, मुंबई का विषय नहीं है. (व्यवधान) सन्माननीय सदस्यांनी आपापल्या जागेवर बसावे.(अडथळा) सन्माननीय सदस्य श्री.अजित पवार हे बोलणार आहेत.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध् एकत्र येऊन घोषणा देत असतात)

सर्व सन्माननीय सदस्यांनी आपापल्या जागेवर बसावे. अशा परिस्थितीत सभागृहाचे कामकाज चालविणे मला शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक दुपारी 12.30 पर्यत स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक दुपारी 12 वाजून 01 मिनिटांनी, दुपारी 12 वाजून 30 मिनिटांपर्यत स्थगित झाली)

-----

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**( स्थगितीनंतर )**

**( अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष ( श्री.योगेश सागर ))**

( दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकत्रितपणे घोषणा देत असतात. )

**तालिका सभाध्यक्ष :** सर्व सन्माननीय सदस्यांनी जागेवर जाऊन बसावे. सभागृहाचे कामकाज चालविण्याकरिता सहकार्य करावे. सर्व सन्माननीय सदस्यांनी शांतपणे जागेवर बसावे. आज सभागृहामध्ये अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा घेण्यात येणार आहे. तसेच, शोक प्रस्तावावर चर्चा घ्यावयाची आहे. या सर्व महत्त्वाच्या कामकाजाकरिता सहकार्य करावे. (अडथळा )

( दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकत्रितपणे घोषणा देत असतात. )

अशा परिस्थितीत सभागृहाचे कामकाज चालविणे अशक्य असल्यामुळे मी सभागृहाची बैठक एक तासाकरिता स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी 12 वाजून 31 मिनिटांनी, एक तासाकरिता स्थगित करण्यात आली. )

------

जी-1/----

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**( स्थगितीनंतर )**

**( अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री. योगेश सागर )**

( दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात. )

श्री. गुलाबराव पाटील : अध्यक्ष महोदय,.....

**तालिका सभाध्यक्ष** : सन्माननीय सदस्य आपण कोणत्या मुद्यावर बोलणार आहात, ते पहिल्या प्रथम सांगावे.

श्री. गुलाबराव पाटील : अध्यक्ष महोदय,....

( दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात. )

**तालिका सभाध्यक्ष** : सभागृहात माननीय मंत्री नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक अर्ध्या तासाकरिता स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी 1 वाजून 31 मिनिटांनी 30 मिनिटांकरिता स्थगित झाली. )

H-1......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**( स्थगितीनंतर)**

**( अध्यक्षस्थानी माननीय अध्यक्ष)**

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य आपापल्या जागेवर उभे राहून घोषणा देत असतात.)

श्री.एकनाथराव खडसे : अध्यक्ष महाराज, महाराष्ट्र राज्याचे महाअधिवक्ता श्री.श्रीहरी अणे यांच्या वक्तव्यावर जो वाद सुरु आहे...( गोंधळ )... महाअधिवक्ता श्री.श्रीहरी अणे यांची भूमिका राज्य सरकारला मान्य नाही.

**अध्यक्ष :** मी सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास आणून देतो की, आपण कृपया शासनाची भूमिका ऐकून घ्यावी. मी सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास आणून देतो की, आपण कृपया जागेवर बसावे.

( दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

श्री.एकनाथराव खडसे : अध्यक्ष महाराज, मराठवाडा, खानदेश विभाग वेगळा व्हावा, हा विषयच राज्य सरकारकडे नाही. राज्याचे महाअधिवक्ता श्री.श्रीहरी अणे यांच्या भूमिकेशी सरकार सहमत नाही, त्यामुळे श्री.श्रीहरी अणे यांनी केलेल्या वक्तव्याविषयी त्यांचेविरुध्द काय कारवाई करावी, यासंदर्भात सरकार त्यांच्या विरुध्द निश्चित कारवाई करणार आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री महोदयांशी चर्चा झालेली आहे. मुख्यमंत्री महोदय, यासंदर्भात विधानसभेत चर्चा करुन उद्या विधानसभेत सभागृह सुरु होण्याच्या वेळेस आपला निर्णय जाहिर करणार आहे. ....(गोंधळ)... आम्हाला नको आहे....(गोंधळ)... अशा रितीने विदर्भ वेगळा करावा, मराठवाडा वेगळा करावा, या भूमिकेशी सरकार सहमत नाही. महाअधिकवक्ता श्री.श्रीहरी अणे यांनी केलेले वक्तव्य योग्य नाही. श्री.श्रीहरी अणे त्यांनी केलेल्या वक्तव्यासंदर्भात मुख्यमंत्री महोदय यासंदर्भात उद्या निर्णय घोषित करणार आहे. माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, कृपया आपण योग्य ते सहकार्य करावे.

( दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

**अध्यक्ष :** सन्माननीय सदस्यांनी कृपया आपल्या जागेवर बसावे. शासनाची भूमिका उद्या सकाळपर्यंत या विषयावर निर्णय जाहिर होणार आहे. सन्माननीय सदस्यांनी कृपया आपल्या जागेवर बसावे. ....(गोंधळ)... सर्व सन्माननीय सदस्यांनी कृपया आपल्या जागेवर बसावे.

.....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

( दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

**अध्यक्ष** : सभागृहात गोंधळसदृश्य परिस्थिती असल्यामुळे मी सभागृहाचे कामकाज दिवसभरासाठी स्थगित करीत आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन मंगळवार, दिनांक 22 मार्च, 2016 रोजी सकाळी 11.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक 2 वाजून 04 मिनिटांनी मंगळवार, दिनांक 22 मार्च, 2016 रोजीच्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.

----------------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION